नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग,
शाखा औरंगाबाद.

जा.क्र. भोगवटा प्रमाणपत्र /मौ.रोटेगांव /ता.वैजापूर/ग.क्र.४७/ससं-औ/ १६८०

औरंगाबाद
दि. १३/८/२०१८

प्रति,

मा. जिल्हाधिकारी,
औरंगाबाद.

विषय :- **भोगवटा प्रमाणपत्र मिळणे बाबत.**
मौजे रोटेगांव ता. वैजापूर जि. औरंगाबाद येथील गट क्र. ४७ मधील मंजूर अभिन्यासातील भूखंड क्र.१ ते ८ क्षेत्र ४३९.८० चौ.मी. क्षेत्रास भोगवटा प्रमाणपत्राबाबत.

संदर्भ :- आपल्या कार्यालयाचे पत्र क्र.२०१८/मशाका/जमीन-१/एनएपी-३४/ मौजे रोटेगांव ता. वैजापूर/प्र.क्र. २३५, दिनांक २९.०६.२०१८.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये विषयांकित प्रकरणी मौजे रोटेगांव ता. वैजापूर जि. औरंगाबाद येथील गट क्र. ४७ मधील मंजूर अभिन्यासातील भूखंड क्र. १ ते ८ बांधकाम क्षेत्र ४३९.८० चौ.मी. क्षेत्रास भोगवटा प्रमाणपत्र मिळणे बाबत या कार्यालयाचे अभिप्राय अपेक्षिलेले आहे.

सदर प्रकरणी या कार्यालयाने पत्र क्र. ३६२, दि.०७.०३.२०१२ अन्वये रहिवास (ग्रुप हौसींग) वापरासाठी अंतिम मंजूरीची शिफारस केलेली आहे. त्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे आदेश क्र. प्र.क्र.४५८, दिनांक ०३.०८.२०१३ अन्वये अकृषीक आदेश पारीत केले आहेत. या कार्यालयाचे पत्र क्र. बांधकाम परवानगी /मौ. रोटेगांव/ता.वैजापूर/ग.नं.४७ पै./ससंऔ/१४०५, दि. २०.०१.२०१७ अन्वये बांधकाम परवानगीची शिफारस केली आहे. त्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी बांधकाम आदेश क्र.२०११/मशाका/जमीन-१/एनएपी-३४/ मौजे रोटेगांव ता.वैजापूर/प्र.क्र.४५८, दि.३१.०५.२०१८ अन्वये आदेश पारीत केला आहे.

आता सदर प्रकरणी भोगवटा प्रमाणपत्राबाबत या कार्यालयाचा अभिप्राय अपेक्षिलेला आहे. सदर प्रकरणात या कार्यालयाने प्रत्यक्ष जागेचे स्थळ निरीक्षण केले असता या कार्यालयाने बांधकाम परवानगीची शिफारस केलेल्या नकाशानुसार व आपल्या कार्यालयाने बांधकाम परवाना दिल्यानुसार सामासिक अंतरे, खोल्यांची रुंदी, लांबी, क्षेत्र व चटई क्षेत्र निर्देशांक इत्यादी बाबी एकसमान आहे. एकूण बांधकाम सर्वसाधारण योग्य असल्याने खालील अटी व शर्तीवर भोगवटा प्रमाणपत्र बाबत शिफारस करण्यात येत आहे. यासोबत भोगवटा प्रमाणपत्र व नकाशे स्वाक्षरीस्तव सादर करण्यात येत आहे.

१) सदर बांधकामाचे स्ट्रक्चरल स्टॅबेलीटी प्रमाणपत्र व भूकंपरोधक प्रमाणपत्राबाबत संबंधीत स्ट्रक्चरल इंजिनिअर/ वास्तुशास्त्रज्ञ यांची जबाबदारी राहील.
२) या कार्यालयाचे रहिवास वापरासाठी अंतिम मंजूरीची शिफारस केलेले पत्र क्र. ३६२, दि.०७.०३.२०१२ रोजीच्या पत्रातील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.
३) मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद कार्यालयाचे अकृषिक आदेश आदेश क्र. प्र.क्र.४५८, दिनांक ०३.०८.२०१३ मधील अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक राहील.
४) या कार्यालयाचे बांधकाम परवानगीचे शिफारस पत्र क्र. १४०५, दि. २०.०१.२०१७ व बांधकाम परवाना आदेश क्र. ४५८, दि.३१.०५.२०१८ मधील अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक राहील.

आपला,

सोबतः - वरील प्रमाणे

प्र. सहायक संचालक, नगर रचना,
औरंगाबाद.

प्रत :- अर्जदार निलेश सिताराम अग्रवाल यांना माहितीस्तव.